ज्ञानसेवा तु साफल्यम्

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या प्राधिकरण), पुणे

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

## विषय सहायक/विषय साधन व्यक्ती विभाग

### सन - २०२३ - २०२४

### नवोपक्रमाचे शीर्षक

"चला परसबाग बनवूया
मुलांचे सद्दढ आरोग्य करूया"

## *नवोपक्रम सादरकर्ता*

***श्री .गणपत देवलू पवार एम. ए.एम.एड***

***विषयसाधन व्यक्ती***

***गटसाधन केंद्र, (वडूज) पंचायत समिती, खटाव***

## प्रेरणास्थान

**मा.डॉ प्राचार्य श्री. रामचंद्र कोरडे**

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,फलटण**

**मा.श्रीम.प्रतिभा भराडे, गटशिक्षणाधिकारी**

**पंचायत समिती खटाव (वडूज)**

## मार्गदर्शक

**मा .श्रीमती अन्नपूर्णा माळी**

**अधिव्याख्याता,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, फलटण सातारा**

### सहकार्य

**श्री. प्रविण जाधव् मुख्याध्यापक**

**जि. प. शाळा शिंदेवाडी**



## नवोपक्रमकर्ता परिचय

| | | |
|---|---|---|
| नवोपक्रम शीर्षक | :- | ‘चला परसबाग बनवूया, मुलांचे आरोग्य सदृढ करूया” |
| नवोपक्रमकर्त्याचे नाव | :- | श्री. गणपत देवलू पवार |
| पदनाम | :- | विषयसाधनव्यक्ती |
| कार्यालय | :- | पंचायत समिती गटसाधन केंद्र, खटाव (वडूज). |
| नवोपक्रम गट | :- | विषय सहाय्यक /विषय साधन व्यक्ती गट |
| कायमचा पत्ता | :- | मु.पो. अंबवडे ता. खटाव जि. सातारा 415506 |
| शैक्षणिक अर्हता | :- | एम ए एम एड डी एस एम |
| नोकरी रुजू दिनांक | :- | 09/11/2006 |
| एकूण सेवा | :- | 17 वर्ष |
| यू डायस क्रमांक | :- | उपक्रम शाळा शिंदेवाडी (ललगूण) 27310406901 |
| संपर्क क्रमांक | : - | 9766382292 |
| E mail | :- | ganapawar142006@gmail.com |

नवोपक्रमासाठी लागलेला कालावधी :- 5 महिने

नवोपक्रम अहवाल एकूण पृष्ठ संख्या :- 22

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ❖ | **प्रस्तावना** | 5 |
| १ | **नवोपक्रमाचे शिर्षक** | 6 |
| २ | **नवोपक्रमाची गरज व महत्व** | 7 |
| ३ | **नवोपक्रमाची उद्दिष्ट्ये** | 7 |
| ४ | **नवोपक्रमाचे नियोजन** | 8 |
| i | उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण | 8 |
| ii | संबंधित व्यक्तिंशी तज्ज्ञांशी चर्चा | 8 |
| iii | आवश्यक साधनांचा विचार | 9 |
| iv | करावयाच्या कृतीचा क्रम | 9 |
| v | उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण | 10 |
| vi | कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक) | 10 |
| vii | उपक्रमासाठी इतरांची मदत | 11 |
| viii | उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे | 12-16 |
| ५ | **नवोपक्रमाची कार्यपद्धती** | 17 |
| i | पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी | 19 |
| ii | कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन | 17 |
| iii | उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व त्यांच्या नोंदी | 17 |
| iv | कार्यवाहीत आलेल्या अडचणी | 17 |
| v | माहितीचे विश्लेषण | 18 |
| ६ | **नवोपक्रमाची यशस्वीता / फलनिष्पती (उद्दिष्टानुसार )** | 19 |
| ७ | **समारोप** | 20 |
| ८ | **संदर्भसूची व परिशिष्ट्ये** | 21 |
| ९ | **प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्रे** | 22 |

## * प्रास्ताविक*

आदरणीय मान्यवर,

सस्नेह नमस्कार.

हा नवोपक्रम सादर करताना, माझ्यासाठी हा केवळ एक उपक्रम नव्हता तर ती एक चांगल्या आरोग्याची तळमळ सर्वांसाठी देशाचे भावी नागरिक घडवित असताना फक्त अध्यापन करणे समोर न ठेवता त्यांना निरोगी आरोग्य कसे प्राप्त होईल याचाही विचार करणे होय..

आज भविष्याचा विचार करता प्रत्येकाला असणाऱ्या आरोग्याच्या तक्रारी कोरोनानंतर बळावत गेल्या आहेत म्हणून काळानुसार व काळानुरूप योग्य भूमिका होणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने शैक्षणिक न सर्वांगीण विकास करायचा असेल तर शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे गरजेचे आहे. भाजीपाल्याचे महत्त्व व सेंद्रीय शेतीचे महत्त्व जाणून घेणेसाठी विविध प्रकारची औषधी वनस्पती लागवड मुलाकडून करून त्याची जोपासना कशी करावी याचे महत्त्व मुलांना व पालकांना पटवून देणेत आहे. सदरची शाळा ही अत्यंत उपक्रमशील असून या शाळेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणेसाठी पालक शिक्षक यांचा सातत्याने सहभाग असतो. खटाव विकास गटात विषय साधनव्यक्ती काम करत असताना उपक्रमशील शाळेमध्ये उपक्रम राबविणेसाठी आम्ही प्रयत्नशील असतो . शिक्षकांना यातून प्रेरणा भेटते व त्यातुनच विद्यार्थांना प्रेरणा देत असतात म्हणूनच यासाठी हा एक छोटासा प्रयत्न.....

नवोपक्रमकर्ता,

श्री. गणपत देवलू पवार
पंचायत समिति खटाव (वडूज)
ता. खटाव जि. सातारा 415506
मोबा नं. 9766382292

१) **नवोपक्रमाचे शीर्षक** :

# “चला परसबाग बनवूया मुलांचे सदृढ आरोग्य करूया ”



## २) नवोपक्रमाची गरज व महत्व :

खटाव विकास गटामध्ये पर्यवेक्षीय यंत्रणेत काम करीत असताना मी जेव्हा वर्गभेट करतो तेव्हा मला असे जाणवले की, शाळेच्या परीसरात भरपूर मोकळी जागा उपलब्ध आहे. त्या मोकळ्या जागेत जर परसबाग लावली तर काय होईल. असा विचार मी शिक्षकांच्या समोर मांडला. त्यावेळी दोन्ही शिक्षकांनी परसबाग तयार करण्याचे ठरविले. परसबागेसाठी सर्व विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांचा सहभाग घेतला.

खटाव तालुक्यामधील ललगुण केंद्रात एकूण १३ शाळांपैकी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी ललगुण या शाळेत इयत्ता १ ते ४ पर्यंतचे वर्ग आहेत. या शाळेत दोन शिक्षक कार्यरत आहेत. ही शाळा डोंगराच्या कुशीत वसलेली आहे. या शाळेच्या परिसरामध्ये परसबाग तयार झाली तर निश्चितच त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल. असे मला वाटले. यासाठी मी या नवोपक्रमाची निवड केली.

## ३) नवोपक्रमाची उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांना कष्टाविषयी माहिती करून देणे.

२) बालवैज्ञानिक तयार करणे.

3) मसाला माती आणि अमृतपाणी तयार करणे.

4) No West Mind, No west Land.

5) आरोग्य संपन्न मुले तयार करणे.

6) चिकीत्सक: सृजनशील विचार विकसित करणे.

7) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे.

## ४) नवोपक्रमाचे वेगळेपण :

१) परसबागेतून विशिष्ट प्रकारचे अनुभव कृतीतून आनंद घेता येतो.

२) विद्यार्थी स्वयंप्रेरित होऊन स्वयंअध्ययनातून शिकण्याचा आनंद घेतात.

३) परसबागेचा उपयोग केवळ शालेय पोषण आहारामध्ये फळभाजी पालेभाजी म्हणून आहारात नियमितपणे उपयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ होण्यास मदत होते.

४) विद्यार्थी स्वत: अनुभवातून कृतीतून सहजतेने शिकतात.

५) तसेच हा उपक्रम उपलबध साहित्यातून व ग्रामस्थाच्या मदतीने दर्जेदार परसबाग तयार होण्यास मदत होते.

६) तसेच हा उपक्रम कमी खर्चात व कमी वेळेत अधिक परिणाम देतो.

## ५) नवोपक्रमाचे नियोजन :

**i) उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण :**

सुरुवातीला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) या शाळेत इयत्ता १ ते ४ थी पर्यंत वर्ग आहेत. या मुलांना सकस आहार मिळावा म्हणून शाळेत ताज्या भाज्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी शाळेला भेट दिली असता,शाळेच्या परिसरामध्ये परसबाग उपलब्ध नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारामध्ये ताज्या भाज्या मिळत नव्हत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे सकस आहार मिळत नाही असे लक्षात आल्यावर या परसबागेची शाळेच्या परिसरामध्ये सर्वांच्या सहकार्यातून परसबागत तयार करण्याचे नियोजीत केले.

**ii) संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा :**

सुरुवातीला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) या शाळेत इयत्ता १ ते ४ थी पर्यंत वर्ग आहेत. या मुलांना सकस आहार मिळावा शाळेत ताज्या भाज्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी शाळेला भेट दिली असता शाळेच्या परिसरामध्ये परसबाग उपलब्ध नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारामध्ये ताज्या भाज्या मिळत नव्हत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे सकस आहार मिळावा यासाठी शाळेतील शिक्षक, ग्रामस्थ, पालक यांच्याशी चर्चा करुन हा नवोपक्रम राबविण्याचे ठरविले.

**iii) आवश्यक साधनांचा विचार :**

या नवोपक्रमाची मांडणी करीत असताना शाळेत उपलब्ध असलेल्या विविध साधनांचा खोरे, पाटी, कुदळ, टेप, दोरी या साधनांचा उपयोग करुन विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांच्या मदतीने परसबाग तयार केली.

**iv) करावयाच्या कृतींचा क्रम :**

या उपक्रमासाठी सर्वप्रथम कृती आराखडा तयार करण्यात आला. बागेसाठी सुरक्षित जागेची निवड करण्यात आली. जागा समतोल करुन केर कचरा साफ करण्यात आला. जमिनीची मशागत केली. खोदकाम करुन जागा समतोल करण्यात आली. परसबागेमध्ये घ्यावयाची फळभाज्या पालेभाज्या इ. साठीची बियाणे निवड करण्यात आली. टेप पट्टीच्या व दोरीच्या साहयाने मोजमाप करुन वाफे तयार करण्यात आले. परसबागेच्या सुरक्षेसाठी सभोवताल भिंतीचे कुंपण तयार करण्यात आले. परसबागेसाठी पाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमामध्ये शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांच्याशी चर्चा करुन पालकांचा सहभाग मिळवला. पालक व विद्यार्थी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सर्वांनी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामध्ये सर्वांनी आनंदाने मदत केली. हा उपक्रम ठरावीक वेळेत पुर्ण करावयाचा होता. याकरीता सहा महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला. त्यासाठी कच्चा आराखडा तयार करुन नियोजनानुसार उपक्रमाचे टप्पे पाडण्यात आले. ते पुढीलप्रमाणे -

1) जमिनीची मशागत व खोदकाम
2) मोजमाप करणे व वाफे तयार करणे
3) बियाणे रोपण व पाणी देणे
4) बागेला कुंपण करणे
5) विविध भाजी पाला व औषधी वनस्पती ची लागवड करणे
6) पाणी देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे
7) शालेय पोषण आहार साठी भाजीपाला चा नियमित पणे वापर करणे

**v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :**

उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण अंतर्गत उपक्रम राबविताना विद्यार्थी कृतीतून स्वयंनिर्मितीचा आनंदा घेताना दिसून आले. प्रत्येक विद्यार्थ्यांचे गट तयार करुन त्या गटामध्ये वाफे वाटून देण्यात आले. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या वाफेची निघा चांगल्या प्रकारे राखली. त्यामुळे फळभाज्या चांगल्या प्रकारे येऊ लागल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने स्वत: केलेल्या परिश्रमामुळे आनंदी होऊन गेले. त्यामुळे शाळेमध्य व शाळेच्या परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

**vi) कार्यवाहीचे टप्पे**

**वेळापत्रक**

**जिल्हा परिषद शाळा, शिंदेवाडी (ललगुण)**
**ता.खटाव. जि.सातारा**

**इयत्ता : १ ते ४ थी**

**कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**

| दिनांक | कार्य |
|---|---|
| जून २०२३ | जमिनीची मशागत व खोदकाम, मोजमाप करणे व वाफे तयार करणे. |
| जुलै २०२३ | बियाणे रोपण व पाणी देणे, बागेला कुंपण करणे. |
| ऑगस्ट २०२३ | परसबागेची देखभाल |
| सप्टेबर 2023 | परसबागेची देखभाल |
| ऑक्टोबर 2023 | मुल्यमापन |

**vii) उपक्रमासाठी इतरांची मदत :**

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक मा. श्री. प्रविण किसन जाधव सर व श्री. सागर राजेंद्र सुतार यांच्या मदतीने हा उपक्रम पूर्ण केला. तसेच पालकांचे व गावातील प्रतिष्ठीत नागरिकांचे सहकार्य लाभले.तसेच माझ्या कार्यायातील मा .गटशिक्षणाधिकारी भराडे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, माझे सर्व सहकारी मित्र व शालेय पोषण आहार विभागाच्या डेटा ऑपरेटर श्रीमती दिपाली भुजबळ मॅडम व सचिन जाधव सर, विशेष असे सहकार्य डायट फलटण येथील सर्व अधिकारी आणि श्री संदीप त्रिंबके सर याचे खूप खूप सहकार्य लाभले आहे.



## उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे









OPPO F17 Pro

**परसबागेतील भाजीपाला**







# मूल्यमापन समिती पाहणी पथक जिल्हा परिषद, सातारा सर्व अधिकारी







# प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (शालेय पोषण आहार) योजनेतंर्गत सातारा जिल्हयातील उत्कृष्ट व प्रथम क्रमांकाचे मानकरी म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी (ललगुण) सन 2023-24

**सातारा जिल्हा परिषद, सातारा**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना**
**(शालेय पोषण आहार योजना)**

कार्यालयाचा पत्ता - जिल्हा परिषद मुख्य इमारत,२ रा मजला, सातारा कोरेगाव रोड सदर बझार, ता.जि. सातारा
Email - sataramiddaymeal@gmail.com

जा.क्र. शिक्षण/प्राथ/शापोआ/प्रशा-२३/१०९२०/२०२३ दिनांक : ०८ /१२/२०२३

प्रति,

१. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सर्व
२. अधिक्षक, प्रभारी अधिक्षक(शापोआ) पंचायत समिती सर्व

विषय — प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण (शालेय पोषण आहार) योजनेअंतर्गत सातारा जिल्हयातील उत्कृष्ट परसबाग स्पर्धेमधील क्रमांक कळविणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण (शालेय पोषण आहार) योजनेअंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत सातारा जिल्हयामध्ये उत्कृष्ट परसबाग स्पर्धा घेण्यात आल्या असून उत्कृष्ट परसबाग स्पर्धेमधील क्रमांक खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्र | क्रमांक | तालुक्याचे नाव | शाळेचे नाव | केंद्र |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम | खटाव | जि.प. शाळा शिंदेवाडी (ललगुण) | ललगुण |
| २ | व्दितीय | जावली | जि.प. शाळा सावंतवाडी | कुडाळ |
| ३ | तृतीय | पाटण | जि.प. शाळा विहे १ | विहे |
| ४ | उत्तेजनार्थ - १ | कराड | जि.प. शाळा भोळेवाडी | सुपने |
| ५ | उत्तेजनार्थ - २ | कोरेगांव | जि.प. शाळा बिचूकले | तळिये |
| ६ | उत्तेजनार्थ - ३ | माण | जि.प. शाळा वाघमोडेवाडी | गोंदवले |

(शबनम मुजावर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
सातारा जिल्हा परिषद सातारा

## ५) नवोपक्राची कार्यपध्दती :

**i) पूर्व स्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

जून २०२३ मध्ये जि.प. प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) येथे भेट दिली असता. शाळेच्या परिसरामध्ये मोकळी जागा उपलब्ध होती. त्या जागेचा शाळेला व शाळेतील विद्यार्थ्यांना परसबागेच्या माध्यमातून फायदा व्हावा. यासाठी पसरबागेच्या माध्यमातून मी नवोपक्रम राबविला.

**ii) कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन**

जि.प. प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) येथे मोकळ्या जागेमध्ये परसबाग तयार केली. या परसबागेमध्ये विविध प्रकारच्या फळभाज्या आल्यानंतर त्यांचा उपयोग शालेय पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांसाठी केला. त्यामुळे रोजचा पोषण आहार उत्कृष्ट होऊ लागला. या उपक्रमामुळे शालेय व गावचे वातावरण आनंदीमय झाले.

**iv) कार्यवाहीत आलेल्या अडचणी :**

नवोपक्रमाची कार्यवाही करताना वेळेची अडचण, उपक्रम राबविता असताना जमिनीवर केर-कचरा साफ करणे, वाफे तयार करणे, खोदकाम करणे अवघड होते. परंतु गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने ते पूर्ण करता आले. तसेच शालेय कामकाज बघत उपक्रम राबवत असताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. या सर्व अडचणीवर मात करत हा नवोपक्रम मी यशस्वी केला.

## माहितीचे विश्लेषण :

**या उपक्रमासाठी निवडण्यात आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे :**

**वर्गनिहाय यादी**

| अ.नं. | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| १ | श्लोक कृष्णा पवार | १ ली |
| २ | संग्राम संपत फाळके | १ ली |
| ३ | ज्ञानेश्वरी गणेश फाळके | १ ली |
| ४ | आरुष निशिगंध फाळके | १ ली |
| ५ | भूमिका विक्रम फाळके | २ री |
| ६ | सई गोरख पाटील | २ री |
| ७ | संजय रामदास फाळके | २ री |
| ८ | शौर्य नागेंद्र नलवडे | ३ री |
| ९ | वेदिका कृष्णा पवार | ३ री |
| १० | जान्हवी भरत नलवडे | ३ री |
| ११ | श्रेयस गौरव फाळके | ३ री |
| १२ | रुद्र सुधाकर नलवडे | ३ री |
| १३ | जान्हवी संपत फाळके | ३ री |
| १४ | विघ्नेश अश्विन ढवळे | ३ री |
| १५ | प्रिया सुधीर ढवळे | ३ री |
| १६ | ईशिका निलेश घाडगे | ३ री |
| १७ | स्वरा सुहास फाळके | ३ री |
| १८ | श्रेयस प्रविण जाधव | ३ री |
| १९ | राघव आनंदराव गुरव | ३ री |
| २० | सिध्दांत गणेश फाळके | ४ थी |
| २१ | आरव हणमंत फाळके | ४ थी |
| २२ | स्वराज शरद फाळके | ४ थी |
| २३ | कस्तुरी रणजित माने | ४ थी |
| २४ | श्रवण संदीप ढवळे | ४ थी |

## ६) नवोपक्रमाची यशस्वीता :

उद्दिष्टानुसार फलनिश्चत्ती बघता या उपक्रमातून मुलांना परसबागेतील फळभाज्या, पालेभाज्या बघून आनंद वाटू लागला.

1) विद्यार्थी परसबागेतील स्वयंनिर्मितीचा आनंद घेऊन उत्साहित झाले.
2) विद्यार्थी परसबागेतील फळभाज्या व पालेभाज्याचे पोषण आहारातील महत्व समजू लागले.
3) विद्यार्थी शेतीचे महत्व, शेतीची मशागत ठिकाणचे संरक्षण कसे करावे यावरुन त्यांना श्रमाचे महत्व समजले.
4) विद्यार्थी परसबागेचे संरक्षण व निगा राखू लागले.
5) विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारले.

अशा प्रकारे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून आला. विद्यार्थ्यांसोबत शिक्षक, पालक यांना देखील हा उपक्रम अतिशय उपयुक्त व महतवाचा आहे. त्यामळे हा नवोपक्रम यशस्वी झाला असे म्हणता येईल.

6)जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी या शाळेचे सलग दोन वर्ष तालुकास्तरावर शालेय पोषण आहार स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे तसेच जिल्हास्तरावर गत वर्षी दुसरा क्रमांक मिळाला त्या यशामध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थी आणि पालक ,ग्रामस्थ यांचा मौलाच वाटा आहे .

सदरच्या शाळेत दरवर्षी परसबागेची नित्यपणे विविध प्रकारे भाजी पाला व औषध वनस्पती लावले जातात.

## ७) समारोप

महाराष्ट्र शासन, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्या मार्फत राज्यस्तरीय नवोपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये मी विषय सहायक, विषय साधन व्यक्ती या गटात सहभाग घेतला असून “चला बनवूया परसबागेतून मुलांचे सदृढ आरोग्य” हा नवोपक्रम मी राबवला. यामध्ये या उपक्रमामुळे विदर्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. कष्ट व परिक्षम करण्याची सवय लागली. मुलांचे आरोग्य सदृढ होण्यास मदत झाली. माझ्या या उपक्रमासाठी पालक व विद्यार्थी यांनीदेखील खूप सहकार्य केले. माझ्या उपक्रमासाठी डायटचे प्राचार्य व सव्र सहकारी, पंचायत समिती खटाव, (वडूज) च्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती प्रतिभा भराडे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. संगिता गायकवाड मॅडम तसेच माझे सर्व सहकारी विषय साधन व्यक्ती, पंचायत समिती खटाव, (वडूज) यांचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले.

हा नवोपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रविण जाधव सर यांचे मार्गदर्शन व श्री सागर सुतार सर यांचे सहकार्य लाभले. त्यांच्यामुळेच हा नवोपक्रम मी यशस्वी करु शकलो, त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

## ८) संदर्भ सूची व परिशिष्ठे

हा नवोपक्रम राबवताना अनेक संदर्भ साहित्याचे नवोपक्रमाचे अहवाल लेखन करणे सुलभ झाले त्यासाठी खालील संदर्भ साहित्य मला उपयोगी पडले


1. 3/4 थी परिसर अभ्यास पाठ्यपुस्तक
2. स्वच्छता अभियानअंतर्गत मार्गदर्शिका
3. शालेय पोषण आहार संबंधित पुस्तिका
4. सकाळ वर्तमानपत्र / खजिना पुलिका
5. YouTube videos, websites,
6. परसबाग एक उपक्रम

## प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र

### प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री गणपत देवलू पवार हे पंचायत समिती खटाव (वडूज) ता.खटाव जि.सातारा येथे विषय साधनव्यक्ती पदावर कार्यरत असून त्यांनी सादर केलेला "चला परसबाग बनवूया, मुलांचे आरोग्य सदृढ करुया"! हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये जि.प.प्रा.शाळा शिंदेवाडी (ललगुण) ता.खटाव जि.सातारा येथे त्यांच्या सहकार्यातून व मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेला आहे.हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक – ४/१२/२०२३

स्थळ - शिंदेवाडी (ललगुण)

गट शिक्षणाधिकारी
खटाव पंचायत समिती वडूज

मुख्याध्यापक
जि.प.प्रा.शाळा शिंदेवाडी
ता.खटाव.जि.सातारा

नाव – प्रविण किसन जाधव

### प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमं/डॉ. गणपत देवलू पवार प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला "चला परसबाग बनवूया मुलांचे आरोग्य सदृढ करुया"! हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 4/12/2023

स्थळ : वडूज

गट शिक्षणाधिकारी
खटाव पंचायत समिती वडूज

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव : गणपत देवलू पवार

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.